तारापूर एज्युकेशन सोसायटीचे

रामचंद्र हिराजी सावे विद्यालय, प्राथमिक शाळा, तारापूर

वाषिक अहवाल सन २०२० - २०२१

ता.ए.सो.आभासी वार्षीक सर्वसाधारण सभा (आंतरजालाद्वारे) दिनांक २६ सप्टेंबर २०२१

तारापूर एज्युकेशन सोसायटीचे, रामचंद्र हिराजी सावे विद्यालय प्राथमिक शाळा २०२० -२०२१ या शैक्षणिक वर्षात प्राथमिक शाळेने ३५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. प्राथमिक शाळेत एकूण ४२७ विद्यार्थी आहेत.

सदर वर्षी करोनाच्या प्रार्दुभावामुळे "शाळा बंद पण शिक्षण सुरू" या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पध्दतीने इ. १ ली ते इ.४ थीच्या वर्गाचे शिक्षण सुरू होते. समग्र शिक्षा अभियान अंतर्गत शासनातर्फे याही वर्षी मोफत पाठयपुस्तकांचे वाटप करोनाचे सर्व अटी व नियम पाळून केले गेले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदूळ, चणे, मसूरडाळ, छिल्टी मूगडाळ यांचे वाटप केले.

शिक्षक उपस्थिती बाबत ऑनलाईन लिंक भरण्यात आली. करोना काळात विद्यार्थ्यांसाठी विविध जयंत्या, उत्सव व सण ऑनलाईन पध्दतीने साजरे करण्यात आले. विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहावे यासाठी दूरदर्शन वरील सहयाद्री वाहिनी वरून इ. १ली ते ४ थीच्या वर्गासाठी "टिलीमिली" या कार्यक्रमाचे प्रक्षेपण केले होते त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला. महिन्याच्या प्रत्येक शनिवारी 'गोष्टीचा शनिवार' या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना मोबाईलवर लिंक पाठवून विविध गोष्टी व त्यावर आधारीत कृतीच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला गेला. प्रत्येक आठवडयाला " को जिनिअस स्वाध्याय उपक्रम" विद्यार्थ्यांसाठी राबविला गेला. १४ नोव्हेंबर रोजी बालदिन ऑनलाईन साजरा करण्यात आला त्यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. चाचानेहरूंना पत्र लेखन हा उपक्रम राबविला गेला. "बालदिन सप्ताह कार्य क्रमाअंतर्गत भाषण" या उपक्रमात इ. १ली व २ रीच्या गटातून सहभाग घेतल्या बद्दल कु.सृजनी रविंद्र जाधव हिला सहभाग प्रमाणपत्र मिळाले. राज्यस्तरीय ऑनलाइन बालकवी काव्यगायन स्पर्धा ज्ञानवर्धिनी विद्याप्रसारक मंडळ नाशिक संचलित डे केअर सेंटर शाळा आयोजित राज्यस्तरीय काव्यगायन स्पर्धाचे आयोजन केले गेले त्यामध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते. कोविड १९ नियत्रंण व मृत्युदर कमी करण्यासाठी

आयोजन केले गेले त्यामध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते. कोविड १९ नियत्रंण व मृत्युदर कमी करण्यासाठी माझे कुटुंब माझी जवाबदारी कोवीड मुक्त महाराष्ट्र ही मोहिम १५.०९.२०२० ते २५.१०.२०२० या कालावधीत राबविली गेली. यात निंबध, पोस्टर, मॅजेस स्पर्धा व शॉर्ट फिल्म या स्पर्धा प्रकारात १.करोना नियंत्रणासाठी "माझे कुटुंब माझी जवाबदारी" २. कोवीड मुक्त महाराष्ट्र या विषयाचे आयोजन केले होते त्यामध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते.

निफा मार्फत "अध्ययन - अध्यापन व शाळा बदलाचे नेतृत्व" हे मुख्याध्यापकांसाठी ऑनलाईन प्रशिक्षण झाले.

DIET पालघर यांच्या मार्फत करोना काळात शिक्षकांसाठी ऑनलाईन प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले होते त्या प्रशिक्षणांचा लाभ सर्व शिक्षकांनी वेळोवळी घेतला.

ऑनलाईन प्रशिक्षणे, व्याख्यान व शिबिरे :-

१. राज्यस्तरीय ऑनलाईन खेळणी निर्मिती उद्‌बोधन कार्यशाळा दि.७.०१.२०२१ ते १२.०१.२०२१ या कालावधीत आयोजित केली होती.

२. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण वेबिनार - नेतृत्व संकल्पना व विविध अंगी जबाबदारी.

३. शाळा संकुलाच्या माध्यमातून कुशल संसाधन व स्थानिक प्रशासन

४. डायट पालघर - नव्या शैक्षणिक धोरणाची आव्हाने

५. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था पालघर शिक्षण विभाग प्राथमिक व माध्यमिक ऑनलाईन वेबिनार शृखंला

६. विद्याभारती समाज प्रबोधनातर्फे ऑनलाईन व्याख्यान - विषय - मुलांच्या सवयी व मानसशास्त्र

७. गुरूकुल उपकमशील शिक्षक समूह व युवाशक्ती प्रतिष्ठान पालघर आयोजित करोना जनजागृती वेबिनार - विषय - करोना व मुले

सर फाऊन्डेशन पालघर आयोजित जिल्हा स्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा २६ जानेवारी २०२१ या स्पर्धेत उत्कृष्ट सहाभागाबद्दल सन्मानपत्र सौ.संगिता संतोष दहिसरकर व सौ.कोमल चंद्रशेखर वडे यांना मिळाले.

सर फाऊन्डेशन पालघर आयोजित जिल्हा स्तरीय "करोना काळातील शिक्षण" या विषयावर आधारीत अनुभव लेखन स्पर्धेत सौ.कोमल चंद्रशेखर वडे यांना तृतीय क्रमांक व सौ.संगिता संतोष दहिसरकर यांना सहभागाबद्दल सन्मानपत्र मिळाले.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग पालघर समायोजित शिक्षण आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन चित्रकला स्पर्धेत गट १ मधून कु.प्रथमेश बबन मोहिते हयास द्वितीय क्रमांक मिळाले व कु.बुश्रा रजबअली शेख हीस स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र मिळाले.

सेतू अभ्यासक्रम इ. २ री ते ४ थीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १ जुलै २०२१ ते १४ ऑगस्ट २०२१ हा ४५ दिवसांचा उपक्रम मागील इयत्तेच्या अभ्यासक्रमावर उजळणी म्हणून राबविण्यात आला. सदर उपक्रमात ३ चाचण्या व प्रत्येक विषयावर आधारीत स्वाध्याय व उजळणी घेण्यात आली.

शाळा बंद व लॉकडाऊनमुळे ग्रामीण व शहरी भागातील सर्वच मुले खेळण्याच्या वयात घरातच असल्यामुळे मुलांमध्ये शारीरिक व मानसिक समस्या निर्माण होऊ नये म्हणून राज्यातील इ.१ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांकरीता सामाजिक व कला क्रिडा विभागामार्फत कला शिक्षण, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण या विषयांच्या अभ्यासक्रमावर आधारीत "शिकू आंनदे" हा उपक्रम ३ जुलै २०२१ पासून राबविला जात आहे.

सौ.श्रद्धा हेमंत चंपानेरकर
मुख्याध्यापिका
रा.हि.सावे विद्यालय,प्राथ.शाळा
तारापूर